



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : १०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२४ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी, या आठवड्यात पाऊस एन्ट्री मारणार !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंत घेतला आहे. राज्यात सर्वदूर अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. त्यामुळे शेतकरी देखील चिंतेत आहेत. पण राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी दिली. राज्यात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात काही जिल्ह्यात पाऊस पडणार आहे. योगायोगाने हे स्वाती नक्षत्र आहे. एक म्हण आहे, पडतील स्वातीत तर पिकतील मोती. तशीच परिस्थिती होणार आहे. शेवटच्या आठवड्यात २५ ते २८ ऑगस्ट या काळात पाऊस पडणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

**२५ ते २८ तारेखदरम्यान कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार?**

पंजाबराव डख यांनी वर्तवलेल्या



अंदाजानुसार, येत्या २५ ते २८ ऑगस्ट दरम्यान वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडणार आहे. त्यानंतर वाशिम, हिंगोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, परभणी, नांदेड, बीड, जालना, जळगाव जामोद, पैठण, नेवासा, कोपरगाव, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर, फुलंब्री, कन्नड या भागांमध्ये पाऊस पडणार आहे. या जिल्ह्यांमध्ये पडणारा पाऊस हा पिकांसाठी खूप दिलासादायक ठरणार आहे. स्वाती नक्षत्रातील पाऊस पिकांसाठी महत्त्वाचा असतो.

**परभणीत ६० ते ७० गावांमध्ये पावसाची शक्यता**

परभणी जिल्ह्यात ८४९ गावे आहेत. त्यापैकी ६० ते ७० गावांमध्ये पाऊस पडेल. काही भाग वंचित राहील. जिल्ह्यात सर्वदूर पाऊस पडत नाही. पाऊस विखुरलेला स्वरुपात पडणार आहे. २५ ते २८ ऑगस्ट या काळातला पाऊस हा भाग बदलत पडणार आहे. त्याचे स्वरुप रिमझिम असणार आहे. कुठे ऊन पडेल, तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस पडणार आहे

**पुढच्या दोन दिवसांत कुठे-कुठे पावसाची शक्यता?**

राज्यात सोलापूर, सांगोला, पंढरपूर, अक्कलकोट या भागात २३ ऑगस्टला दुपारनंतर संध्याकाळी पावसाची शक्यता आहे. सर्वदूर पावसाची शक्यता आहे. श्रीगोंदा, अहिल्यानगरमध्येही पावसाची शक्यता आहे. कोल्हापूरमध्ये रिमझिम पाऊस सुरु राहणार आहे. राधानगरी ते पालघरपर्यंत सरीवर सरी सुरु राहतील. पुण्यातही सरी सुरु राहतील.

**५ ते २७ ऑगस्ट काळात 'या' जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता**

पुढच्या तीन दिवसांत विदर्भात सर्वाधिक पावसाची शक्यता आहे. अमरावतीत २५ ते २७ ऑगस्टच्या दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, अकोट या परिसरात २५ ते २७ ऑगस्टच्या दरम्यान ओढे, नाले वाहतील इतक्या पावसाची शक्यता आहे. परभणी जिल्ह्यात रविवारी रात्री पावसाची शक्यता आहे. वंचित भाग राहिलेल्या धाराशिव, सोलापूर, लातूर, बीड जिल्ह्याचा काही भाग, परभणी, जालना, नांदेड या जिल्ह्यांमध्ये रविवारी रात्री आणि सोमवारी चांगल्या पावसाची शक्यता आहे.

# पनवेलमध्ये एलपीजी माफियांचा सुळसुळाट; १ हजारांचा सिलेंडर ३ हजारांत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, पनवेल :** पनवेल परिसरात घरगुती एलपीजी सिलिंडरच्या काळाबाजाराला ऊत आला असून काही खासगी दुकानदारांकडून सर्वसामान्य नागरिकांची सर्रास आर्थिक लूट केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एलपीजी गॅसच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शासनाने घरगुती गॅस सिलिंडरच्या बुकिंगवर काही निर्बंध लागू केले आहेत. त्यामुळे ठराविक कालावधी पूर्ण झाल्याशिवाय दुसरा सिलिंडर बुक करता येत नसल्याने अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काही खासगी दुकानदारांकडून घरगुती एलपीजी सिलिंडरची गुप्तपणे आणि मनमानी दराने विक्री केली जात असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. सुमारे १,००० रुपयांना मिळणारा घरगुती सिलिंडर काही ठिकाणी २,५०० ते ३,००० रुपयांपर्यंत विकला जात असल्याचा आरोप होत आहे. वाढत्या महागाईमुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांसाठी हा अतिरिक्त आर्थिक बोजा ठरत असून संतापाची लाट पसरली आहे. कायद्यानुसार १४.२ किलोचा घरगुती एलपीजी



सिलिंडर विक्री करण्याचा अधिकार केवळ अधिकृत एलपीजी वितरक आणि शासनमान्य विक्रेत्यांनाच आहे. इंडियन गॅस, भारत गॅस, एचपी गॅस यांसारख्या तेल कंपन्यांच्या अधिकृत वितरकांशिवाय इतर कोणत्याही किराणा दुकान, जनरल स्टोअर किंवा खासगी आस्थापनांना घरगुती एलपीजी सिलिंडर विक्री करण्याची परवानगी नाही. तसेच एलपीजी साठवणूक आणि विक्रीसाठी Petroleum and Explosives Safety Organization (PESO) चे आवश्यक परवाने आणि अधिकृत साठवणूक केंद्र असणे बंधनकारक आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, मोठ्या कुटुंबांमध्ये गॅसचा वापर अधिक असल्याने सिलिंडर लवकर संपतो. मात्र, शासनाने निश्चित केलेल्या कालावधीपूर्वी नवीन सिलिंडर मिळत नसल्याने अशा कुटुंबांना खासगी विक्रेत्यांकडून अवाजवी दराने सिलिंडर खरेदी करण्याची वेळ येते. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून याच परिस्थितीचा फायदा अनधिकृत सिलिंडर विक्रेते घेत असल्याचा आरोप केला जात आहे.

घरगुती एलपीजी गॅसची मनमानी पद्धतीने विक्री करणाऱ्या खासगी दुकानांवर कारवाई कधी होणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच अशा प्रकारे नागरिकांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

यासोबतच शासनाने घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंगसंदर्भातील कालावधीच्या अटींमध्ये शिथिलता आणून मोठ्या कुटुंबांसाठी अतिरिक्त सिलिंडर उपलब्ध करून देण्याचा विचार करावा, अशीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, जिल्हा पुरवठा विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून अनधिकृत एलपीजी विक्री करणाऱ्या आस्थापनांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# १७ पैकी केवळ एका ग्रामपंचायतमध्ये ओबीसी सरपंच!

## बल्लारपूर तालुक्यात सरपंच पदाचे आरक्षण : जुलै २०२५ मध्ये होते ५ ठिकाणी राखीव

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, विसापूर (चंद्रपूर) :** राज्य निवडणूक आयोगाने २३ जुलै २०२६ च्या पत्राद्वारे एकूण ५० टक्के पेक्षा जास्त असलेल्या बल्लारपूर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षणात सुधारणा करण्याचे योजिले आहे.

त्यानुसार येत्या ४ सप्टेंबर २०२६ रोजी सरपंच पदाचे नव्याने आरक्षण सोडत काढण्याची सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वसुमना पंत यांनी केली आहे. यामुळे बल्लारपूर तालुक्यात १७ पैकी केवळ एका ग्रामपंचायत मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) सरपंच पद आरक्षित असल्याचे समोर आले आहे. यामुळे ओबीसी समुहात पुन्हा एकदा तीव्र संताप व्यक्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ८ जुलै २०२५ च्या आरक्षण सोडतीत पाच ग्रामपंचायत मध्ये ओबीसी सरपंच पद दिले होते.

बल्लारपूर तालुक्यात एकूण १७ ग्राम




पंचायत आहे. यापैकी गतवर्षी ८ जुलै रोजी सरपंच पदांच्या आरक्षण सोडतीत नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) सरपंच पद विसापूर (ओबीसी महिला), कळमना (ओबीसी महिला), नांदगाव (पोडे) (ओबीसी सर्वसाधारण), बामणी दुधोली) (ओबीसी सर्वसाधारण) व पळसगाव (ओबीसी सर्वसाधारण) असे सरपंच पदाचे आरक्षण देण्यात आले होते. मात्र नव्याने काढण्यात येणाऱ्या आरक्षण सोडतीत १७ पैकी केवळ एका ग्रामपंचायत मध्ये ओबीसी सरपंच असणार आहे. यामुळे लोकसंख्या निर्णायक असणाऱ्या ओबीसी समुहात नाराजीचा स्वर उमटण्याची शक्यता बळावली आहे.

बल्लारपूर तालुक्यातील एकूण १७ ग्रामपंचायत पैकी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तीन, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी चार, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी केवळ एक, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ९ असे नव्याने आरक्षण सोडत काढण्याचे फर्मान जाहीर केले आहे. विशेष म्हणजे नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) असे एकमेव ग्रामपंचायत मध्ये सरपंच पद आरक्षित करण्यात आले असून ते महिला साठी राखीव राहणार आहे.

यामुळे बल्लारपूर तालुक्यात विसापूर, कळमना, नांदगाव (पोडे), बामणी (दुधोली), पळसगाव, कवडजई, किन्ही, काटवली (बामणी), कोठारी व कोर्टीमक्ता यापैकी कोणत्या ग्रामपंचायत मध्ये ओबीसी महिला सरपंच पद राखीव होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**मागील वर्षी असे होते सरपंच पदाचे आरक्षण**

बल्लारपूर तालुक्यात ८ जुलै २०२५ रोजी १७ ग्रामपंचायत मध्ये आरक्षण सोडत काढण्यात आली होती. त्यावेळी ओबीसी प्रवर्गासाठी विसापूर, कळमना, नांदगाव (पोडे), बामणी (दुधोली) व पळसगाव असे सरपंच पदाचे आरक्षण होते. सर्वसाधारण प्रवर्गासाठी कवडजई, किन्ही, काटवली (बामणी), कोठारी व कोर्टीमक्ता या ग्रामपंचायत मध्ये सरपंच पद दिले होते. अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी लावारी, मानोरा, हडस्ती व आमडी असे सरपंच पदाचे आरक्षण होते. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गासाठी इटोली, गिलबीली व दहेली येथे सरपंच पद आरक्षित होते. नव्याने काढण्यात येणाऱ्या सरपंच पदांच्या आरक्षणात अनुसूचित जाती (एससी) ३, अनुसूचित जमाती (एसटी) ४, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) केवळ १ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ९ असे सरपंच पदाचे आरक्षण राहणार आहे. यामध्ये अनुसूचित जाती महिला २ , अनुसूचित जमाती महिला २, ओबीसी महिला १ व सर्वसाधारण प्रवर्गातील महिला ४ अशा एकूण ९ सरपंच पद महिलांना आरक्षित करण्यात येणार आहे.

# बिहार ते चंद्रपूर अवैध शस्त्र तस्करीचा डाव उधळला ;

## दोन पिस्तुले, १३ जिवंत काडतूसे जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** बिहारमधून चंद्रपूरमध्ये अवैध अग्निशस्त्रांची तस्करी करून त्यांची विक्री करण्याचा प्रयत्न स्थानिक गुन्हे शाखेने उधळून लावला. पोलिसांनी



नाकाबंदी करून तीन संशयितांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून दोन बनावट लोखंडी पिस्तुलसदृश अग्निशस्त्रे, दोन मॅगझिन, १३ जिवंत काडतुसे, तीन मोबाइल फोन आणि टाटा झेस्ट कार असा एकूण सुमारे ६ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २२ ऑगस्ट रोजी पहाटे पडोली चौक परिसरात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नागपूरकडून चंद्रपूरच्या दिशेने पांढऱ्या रंगाच्या टाटा झेस्ट कारमधून काही व्यक्ती अग्निशस्त्रे घेऊन येत असल्याची माहिती मिळाली.

प्राथमिक चौकशीत ही शस्त्रे बिहार राज्यातून आणण्यात आली असून, नागपूर येथे पोहोचल्यानंतर ऑनलाइन वाहन बुक करून चंद्रपूरमध्ये विक्री करण्यासाठी आणली जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या तस्करीमागे नेमके कोणते जाळे कार्यरत आहे, शस्त्रांचा पुरवठा कोण करत आहे आणि चंद्रपूरमध्ये त्यांची विक्री कोणाला केली जाणार होती, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या प्रकरणी पडोली पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांमध्ये दुर्गेशकुमार सुधीर मिश्रा (२६), रा. गोपालपुर, ता. केवटी, जि. दरभंगा; रविकुमार राजकुमार पासवान (१९), रा. पिंडारून, ता. केवटी, जि. दरभंगा; आणि सुनिलकुमार विजय साहानी (२०), रा. गोपालपुर, ता. केवटी, जि. दरभंगा, बिहार यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे नाकाबंदीदरम्यान नागपूरकडून चंद्रपूरकडे येणारी एमएच १४ जीडी ०७०८ क्रमांकाची टाटा झेस्ट कार पोलिसांनी थांबवली. वाहनातील व्यक्तींच्या हालचाली संशयास्पद वाटल्यान त्यांची झडती घेण्यात आली. यावेळी दोन बनावट लोखंडी पिस्तुलसदृश अग्निशस्त्रे, दोन मॅगझिन आणि १३ जिवंत काडतुसे आढळून आली. याशिवाय तीन मोबाइल फोन व वाहनही पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईमुळे बिहार ते चंद्रपूर अशा संभाव्य अवैध शस्त्रतस्करीच्या मार्गावर पोलिसांनी मोठा घाव घातला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पडोली पोलिसांकडून सुरू असून, या तस्करीच्या साखळीत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सपोनि, दिपक कॉंक्रेडवार, पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सर्वेक्ष बेलसरे, पोउपनि सुनिल गौरकार, पोहवा सतिश अवथरे, लालु यादव, इसान खान, हिरालाल गुप्ता, संदिप कांबडी, शरद कुडे, अजय बागेसर, गणेश भोयर, रामा बिंगेवार, पोअं शशांक बदामवार, किशोर वाकाटे, शेखर माथनकर, चापोअं/वृषभ बारसिंगे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपुर तसेच पोहवा कार्तीक खनके, पोअ गुणंवत, अनिमेश पोस्टे सायबर सेल, चंद्रपुर येथील अधिकारी व अंमलदार यांनी केले.

# 'मोबाईलच्या स्क्रोलिंगपासून मनाच्या बोलण्यापर्यंत...

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२३, सोलापूर :** आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसे एकमेकांच्या जवळ असूनही संवाद मात्र दूर होत चालला आहे. विशेषतः तरुण पिढीमध्ये वाढत चाललेली नैराश्याची भावना, नकारात्मकता, व्यसनाधीनता आणि मनातील गोष्टी व्यक्त न करण्याची प्रवृत्ती लक्षात घेऊन हिंदवी परिवाराने एक विधायक आणि काळाची गरज ओळखणारा उपक्रम हाती घेतला आहे. परस्परांमधील हरवत चाललेला संवाद पुन्हा वृद्धिंगत व्हावा, तरुणांना व्यक्त होण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि सकारात्मक विचारांची दिशा मिळावी, या उद्देशाने हिंदवी परिवाराचे संस्थापक तथा शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांच्या संकल्पनेतून 'शिवप्रबोधन संवाद' या उपक्रमाची सुरुवात होत आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता चार हुतात्मा पुतळ्यासमोरील खंदक बागेत होणार आहे. यानंतर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ८ वाजता हा उपक्रम नियमितपणे घेण्यात येणार आहे.

उपक्रमाच्या सुरुवातीला सुमारे १५ मिनिटे वा. सी. बेंद्रे लिखित शिवचरित्राचे वाचन केले जाईल. त्यानंतर डॉ. शिवरत्न शेटे सर उपस्थितांशी प्रबोधनात्मक संवाद साधणार आहेत. मात्र या उपक्रमाचे वैशिष्ट्य केवळ प्रबोधनापुरते मर्यादित नसून, त्यानंतर उपस्थित तरुण, पालक आणि नागरिकांशी मनमोकळा संवाद साधण्यात येणार आहे. आजच्या तरुणाईला केवळ उपदेश नको, तर ऐकून घेणारे कान आणि व्यक्त होण्यासाठी सुरक्षित व्यासपीठ आवश्यक आहे. याच भावनेतून तरुणांना त्यांच्या मनातील प्रश्न, भावना, अडचणी आणि विचार मोकळेपणाने मांडता यावेत, त्यांना सकारात्मक 'आऊटलेट' मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे डॉ. शिवरत्न शेटे यांनी नियोजन बैठकीत व्यक्त केले.

इयत्ता आठवीपासून पुढील विद्यार्थी, युवक-युवती, त्यांचे पालक तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ तरुणांसाठीच नव्हे, तर विविध पिढ्यांना एकत्र आणणारा संवादाचा सेतू ठरणार आहे. इतिहास, संस्कृती, समाज आणि विविध विषयांवर प्रभुत्व असणाऱ्या डॉ. शिवरत्न शेटे यांच्यासारख्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे सान्निध्य तरुणांना लाभणे ही निश्चितच एक सकारात्मक संधी आहे. शिवचरित्रातून प्रेरणा, प्रबोधनातून विचार आणि संवादातून मनाला मोकळीकअशा त्रिसूत्रीवर आधारित हा उपक्रम आजच्या पिढीसाठी निश्चितच उपयुक्त ठरण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, या उपक्रमाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीस हिंदवी परिवारातील सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपक्रम यशस्वी करण्यासाठी विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.तरुणाईला फक्त दिशा देण्याऐवजी तिचे मन ऐकण्याचा प्रयत्न करणारा 'शिवप्रबोधन संवाद' हा उपक्रम समाजात सकारात्मक बदलाची नांदी ठरू शकतो. त्यामुळे विद्यार्थी, युवक-युवती, पालक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या संवादयात्रेचा भाग व्हावे, असे आवाहन हिंदवी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

संपादकीय

## दुःखात सुचती मार्ग सुखाचे...

मेळघाट, गडचिरोलीसारखा निसर्गदत्त श्रीमंत भाग विदर्भाच्या भाळी आला. त्यातून कुठे वैभवाचे लेणे लाभले, तर कुठे अभावाचे अभागी जगणे. दुर्गम भाग, जिथे सुविधा पोहोचल्या नाही, तिथे यंत्रणांचे दुर्लक्ष झाले हे वास्तव आहे. वास्तव हेसुद्धा आहे की तेथील लोक रडत बसले नाहीत. जे समोर वाढून ठेवले आहे, त्याच्याशी लढत परिस्थितीला सामोरे गेले.

जपतलाईच्या आश्रमशाळेत सहा मुलींना साप चावला. त्यातील तीन मृत्युमुखी पडल्या. एकीला उपचारांसाठी हेलिकॉप्टरने नागपुरात आणले. शर्थीच्या प्रयत्नांनी ती बचावली. मृत्यूच्या दारातून आत बघून मोठ्या हिमतीने परत आलेली मुलगी जेव्हा बरी होऊन तिच्या गावाकडे जायला निघाली, तेव्हा तिला घेऊन जाणारी बस खराब रस्त्यांमुळे चिखलात रुतून बसली. तिला धक्के देऊन चिखलातून काढावे लागले. या बातम्या वाचून अनेक जण हळहळले. काहींना संताप आला असेल; पण या बिकट परिस्थितीवर मात कशी करावी हे कुणालाही सुचले नसेल; कारण त्यांच्या दुःखाची, संतापाची तीव्रता तेवढी नसावी; जेवढी तुळशीराम गेडाम यांची होती.

तुळशीराम गेडाम हे महाराष्ट्र आणि तेलंगण सीमेवरील घोडनकप्पी या दुर्गम गावाचे रहिवासी. त्यांची पत्नी गर्भवती होती. ते दोघे नव्या जिवाच्या आगमनाची स्वप्ने बघत होते. अचानक पत्नीची प्रकृती बिघडली. त्यांनी रुग्णवाहिका बोलावली. मात्र, रस्ते खराब असल्याने ती वेळेवर पोहोचू शकली नाही. त्यांच्या गर्भवती पत्नीचा आणि तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाला. कोणतीही व्यक्ती अशा घटनेने चिडून जाईल, मोडून जाईल. तुळशीरामांना दुःख झाले; पण ते चिडले नाहीत आणि मोडलेही नाहीत. त्यांच्या दुःखातून एका ध्येयाने जन्म घेतला. आपली पत्नी ज्या परिस्थितीला बळी पडली, ही परिस्थिती इतर कुणाच्या वाट्याला येऊ नये, अन्य कुण्या मातेचे बाळ अकाली जाऊ नये, पित्याच्या डोळ्यांत आसू येऊ नयेत म्हणून त्यांनी हातात कुदळ-फावडे घेतले आणि रस्ता बनवायच्या कामी लागले. हळूहळू गावकरी त्यांच्या सोबत जुळले. वीस गावकऱ्यांच्या मदतीने त्यांनी काही दिवसांतच दीड किलोमीटरचा रस्ता बनवला. आता त्या रस्त्यावरून वाहने भरधाव पळू शकतात. ना कुणाकडे अर्ज केला, ना कुणाला निवेदन दिले. ना शासनाच्या मदतीची अपेक्षा बाळगली, ना सहानुभूतीची अपेक्षा. मनगटाच्या जोरावर बदल करून दाखविला.

वाशीम जिल्ह्यातील कळंबेश्वर गावात यापेक्षा काय वेगळे घडले होते! काही वर्षांपूर्वी गजानन ताजणे या कष्टकरी व्यक्तीची पत्नी संगीता, भर उन्हाळ्यात पाणी भरण्यासाठी हंडा घेऊन शेजारच्या विहिरीवर गेली. 'मलेच नाही पुरत तं तुले काय देऊ' म्हणत त्याने तिला पाणी तर भरू दिलेच नाही; उलट वाईट शब्दांची लाखोली वाहिली. ती रडतच घरी आली. तिच्या अश्रूंनी कमाल केली. ताजणेंच्या मनात ऊर्मी जागवली. त्यांनी कडकत्या उन्हात फावडे-कुदळ हाती घेतले आणि विहीर खोदण्यास प्रारंभ केला. शेजारीपाजारी हसत होते. पंधरा-वीस फूट खोल खोदत नाही तो विहिरीला झरा लागला. पाणी आले. सलग महिनाभर घाम गाळून त्यांनी आपल्या पत्नीला पाणीदार भेट तर दिलीच; पण ज्यांच्या मनात माणुसकीचा दुष्काळ दाटला होता, त्या पाणी नाकारणाऱ्यांच्या पाषाणहृदयाला पाझर फोडला. त्यांच्या विहिरीला मुबलक पाणी आहे. ते घेऊन जाण्यास कुणालाच मनाई नाही.

दशरथ मांझीने डोंगर फोडून रस्ता केला, तेव्हा त्याला 'माउंटन मॅन' म्हणून गौरवले. या दोन वैदर्भीय वीरांना काय म्हणावे? त्यांना काहीच म्हणू नये; त्यांच्या कार्यातून धडा तेवढा घ्यावा. परिस्थिती बदलण्यासाठी नेहमी सरकारचीच सोबत लागते, मोठी साधने लागतात असे नव्हे. इच्छाशक्ती प्रबळ असली की, साधी कुदळ पुरेशी ठरते. ती निर्धाराने जमिनीत खुपसली पाहिजे, निराशेची माती उकरली पाहिजे. तेव्हा बिकट वाटा, चांगल्या रस्त्याचे रूप घेतात आणि विहिरीतील दगडांना पाझर फुटतो.

**-- अतुल पांडे**

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यविश्वात आपल्या असामान्य प्रतिभेने अढळ स्थान निर्माण करणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची आज जयंती. कोणतेही औपचारिक शिक्षण न घेतलेल्या, आयुष्यभर कष्ट आणि संघर्षाला सामोरे गेलेल्या या निरक्षर स्त्रीने आपल्या अनुभवातून, निरीक्षणातून आणि उपजत काव्यप्रतिभेतून असे साहित्य निर्माण केले की, ते महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांच्या मनावर आजही राज्य करीत आहे.

बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगावजवळील असोदे या गावी झाला. त्या काळातील सामाजिक परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. पुढे तरुण वयातच त्यांच्यावर वैधव्याचे दुःख कोसळले. एकत्र कुटुंब विभक्त झाल्यानंतर आणि पतीच्या निधनानंतर त्यांचे जीवन अत्यंत खडतर झाले. मात्र या प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार केले.

बहिणाबाई कधीही शाळेत गेल्या नाहीत. त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते. परंतु कविता ही त्यांच्या रक्तातच होती. शेतात काम करताना, घरातील कामे करताना, जात्यावर दळताना त्यांच्या मनात काव्य उमटत असे. त्या उत्स्फूर्तपणे कविता आणि ओव्या म्हणत. त्यांच्या असंख्य कविता त्यांनी स्वतः लिहिल्या नाहीत, त्यामुळे त्यातील अनेक रचना काळाच्या ओघात हरवून गेल्या.

मात्र त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी शाळेत जाऊ लागल्यानंतर आईच्या कविता वहीत लिहून ठेवू लागले. त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी यांचीही मदत मिळाली. अशा प्रकारे बहिणाबाईंच्या मौखिक काव्याला लिखित स्वरूप मिळाले. पुढे सोपानदेव चौधरी हेही महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून प्रसिद्ध झाले.

बहिणाबाईंच्या निधनानंतर सोपानदेव यांनी त्यांच्या कविता आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना दाखवल्या. या कविता वाचल्यानंतर अत्रे यांनी त्यांच्या प्रतिभेचे मोल ओळखले आणि त्या महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा अन्याय ठरेल, अशी भावना व्यक्त केली. १९५२ मध्ये आचार्य अत्रे यांच्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कवितांचा संग्रह प्रकाशित झाला आणि महाराष्ट्राला या अद्भुत कवयित्रीची ओळख झाली.

बहिणाबाईंच्या कविता त्यांच्या मातृभाषेतील वऱ्हाडी-अहिराणी-खानदेशी बोलीच्या सहज, ओघवत्या आणि जिवंत भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय त्यांच्या आजूबाजूचे जग होतेसंसार, माहेर-सासर, शेती, कष्टकरी जीवन, निसर्ग, पशुपक्षी, सण-उत्सव, आई-वडील, भाऊ-बहीण आणि मानवी नातेसंबंध. त्यामुळे त्यांच्या कविता वाचताना त्या केवळ कविता वाटत नाहीत; त्या आपल्या जगण्याचेच प्रतिबिंब वाटतात.



तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख-दुःखांकडे समतोलपणे पाहण्याची दृष्टी आणि अनुभवातून आलेले जीवनतत्त्वज्ञान ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये होती. अरे संसार संसार, खोप्यामधी खोपा, मन वढाय वढाय, धरित्रीले दंडवत यांसारख्या त्यांच्या कविता महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांनी वाचल्या, ऐकल्या आणि मनात जपल्या आहेत.

बहिणाबाईंच्या कवितेत मोठमोठे शब्द नाहीत; पण साध्या शब्दांत जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान सामावलेले आहे. त्यांच्या कवितेतील निसर्ग हा केवळ वर्णनाचा विषय नाही, तर तो त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे. शेतातील पिके, पक्षी, चूल, जातं, संसार आणि माणसांमधील नाती यांच्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी विलक्षण होती. म्हणूनच त्यांची कविता कालबाह्य झाली नाही; उलट काळ बदलला तरी तिची प्रासंगिकता कायम राहिली.

आज त्यांच्या अनेक कविता शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी त्यांच्या कवितांचे अध्ययन केले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला 'कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' हे नाव देण्यात आले, ही त्यांच्या साहित्यिक योगदानाला मिळालेली मोठी आदरांजली आहे.

ज्या स्त्रीला औपचारिक शिक्षणाची संधी मिळाली नाही, तिने आपल्या जीवनानुभवातून आणि उपजत प्रतिभेतून मराठी साहित्याला अमूल्य ठेवा दिला. परिस्थितीने त्यांना अडवले, पण त्यांच्या प्रतिभेला कधीच रोखू शकले नाही. म्हणूनच बहिणाबाई चौधरी या केवळ एक कवयित्री नाहीत, तर महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आणि मातीतल्या संस्कृतीचा जिवंत आवाज आहेत.


३ डिसेंबर १९५१ रोजी त्यांचे निधन झाले; मात्र त्यांच्या कविता आजही जिवंत आहेत. काळाच्या ओघात अनेक साहित्यिकांची नावे विस्मृतीत जातात; परंतु बहिणाबाईंच्या कविता मात्र महाराष्ट्राच्या मनात कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे अनुभवातून उमटलेले बावनकशी सोनेच!

या महान कवयित्रीच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! त्यांच्या साहित्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# उत्सव डीजेमुक्त साजरे होतील का ?

कोणताही उत्सव म्हटला की डीजे वाजलाच पाहिजे. अशा मताचा एक वर्ग समाजात आहे ज्यामध्ये अधिकांश तरुणवर्ग आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेला गोपाळकाला हा उत्सव मुंबई, ठाणे, रायगड, पुणे यांसारख्या शहरांत इव्हेंन्ट म्हणून साजरा केला जातो. थरावर थर रचणाऱ्या गोविंदा पथकांना लाखोंची बक्षिसे मिळवून देणाऱ्या या इव्हेंट्समध्ये डीजे जणू अनिवार्य झाला आहे. पुढच्याच महिन्यांत येणाऱ्या गणेशोत्सवांत आगमन आणि विसर्जन मिरवणुकींमध्ये डीजे वाजवण्याचा तरुण मंडळींचा विशेष हट्ट असतो.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे साऊंड सिस्टिममुळे होणारे ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी नुकतीच पोलीस आयुक्तालयात विविध प्रकारच्या साऊंड सिस्टिमची प्रत्यक्ष चाचणी घेतली. या वेळी आवाजाची डेसिबल पातळी, स्पीकरची क्षमता



आणि ध्वनिप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या उपकरणांची माहिती घेण्यात आली. कर्णकर्कश आवाजातील त्रासदायक डीजे साउंडवर निर्बंध आणण्याची सिद्धता पुणे पोलिसांनी केली आहे. डीजे साउंडमुळे होणारे जीवघेणे परिणाम लक्षात घेऊन डीजेवर कायमस्वरूपी आणण्याची मागणी करणाराही मोठा वर्ग समाजात आहे. सार्वजनिक उत्सव, महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी यानिमित्ताने काढल्या जाणाऱ्या मिरवणुका यांमध्ये सर्रासपणे डीजे वाजवला जातो. एखाद्या देवतेच्या गाण्याने वाजायला सुरुवात करणारा हा डीजे हळूहळू रंगात येऊन कधी 'मुन्नी बदनाम हुई', 'एक बोतल व्होडका काम मेरा रोज का' यांसारख्या गाण्यांवर सरकतो हे कळतही नाही आणि या मिरवणुकीत चित्रविचित्र अंगविक्षेप करत नाचणारी मंडळीही अशी गाणी वाजू लागली की अधिक जोमाने धिंगाणा घालू लागतात. आपण कोणत्या महापुरुषाच्या मिरवणुकीत नाचतो आहोत, त्यांची शिकवण काय, आपल्याला असे थिरकताना पाहून त्या महापुरुषांच्या आत्म्याला किती वेदना होत असतील याचा तिळमात्र विचार या मंडळींकडून केला जात नाही. गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत मंगलवाद्यांसह काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत मोजकीच मंडळी दिसतील मात्र ज्या मिरवणुकीत डीजे वाजवला जातोय अशा ठिकाणी आजूबाजूला हजारोंचा समुदाय पाहायला मिळतो. डीजेमुळे आरोग्यावर होणाऱ्या भयंकर परिणामांमुळे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच डीजे वाजवण्यावर बंधने आणली आहेत. मिरवणुकीत डीजे वाजवण्यास स्वतंत्र परवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे, डीजेच्या आवाजाला ४० डेसिबल्सची मर्यादा घालून देण्यात आली आहे; मात्र ही मर्यादा सर्वत्रच ओलांडली जाते. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची दाखल घेत अनेक वेळा या डीजेंवर पोलिसांकडून कारवाईही केली जाते, तरीही डीजे वाजवणाऱ्यांचे प्रमाण काही कमी झालेले नाही. सण-उत्सवांच्या निमित्ताने वाजणाऱ्या डीजेचा सर्वाधिक त्रास होतो तो जेष्ठ नागरिकांना. डीजेवर न्यायालयाने घातलेल्या बंदीचा विचार करून सरकारने त्यावर ठोस उपाययोजना करावी यासाठी साताऱ्यातील जेष्ठ नागरिक संघाने मागच्या वर्षी गांधी मैदान ते पोवई नाका असा भर पावसात निषेध मोर्चा काढल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

डीजेच्या जीवघेण्या आवाजामुळे प्रचंड प्रमाणात ध्वनीप्रदूषण तर होतेच शिवाय या आवाजातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे खिडक्या आणि तावदानांच्या काचांना तडे जातात, लहान मुले, वयोवृद्धांच्या हृदयाला त्रास होतात, अनेक यंत्र बंद पडतात, मंडणीवरील भांडी कोसळतात, भिंतींनाही तडे जातात, रक्तदाब वाढू शकतो, हृदयरोग असणाऱ्या मंडळींना डीजेच्या आवाजामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. कर्कश आवाजामुळे कानाच्या अंतर्गत पेशींना इजा होऊन बहिरेपणा येऊ शकतो. डीजेमुळे गरोदर स्त्रियांचे हृदयाचे ठोके वाढून वेळेपूर्वी प्रसूती होण्याचे, प्रसंगी गर्भपात होण्याचीही शक्यता असते. त्वचारोग तज्ज्ञांच्या मते डीजेच्या आवाजामुळे त्वचारोगही बळावतात. डीजेचा आवाज सतत कानी पडल्याने चिडचिड होणे, निद्रानाश, नैराश्य येणे यांसारखे मानसिक विकार उद्भवण्याचा धोका असल्याचे मानसोपचारतज्ञ सांगतात. डीजेमुळे होणारी सामाजिक, शारीरिक आणि मानसिक हानी लक्षात घेऊन न्यायालयाने यावर निर्बंध आणले असले तरी लोकांच्या हौसेपुढे ते सर्रासपणे पायदळी तुडवले जातात. गेल्या काही वर्षांत वाढदिवस, लग्न, मिरवणूका यांमध्ये डीजे वाजवण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे, ज्यामुळे घरच्या कार्यक्रमात डीजे वाजवणे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले आहे. सण उत्सवांत डीजे वाजवणे हा आपला जन्मसिद्ध अधिकारच असल्याची भावना आजच्या पिढीत निर्माण होऊ लागली आहे. अशावेळी पोलिस प्रशासन, न्यायालय यांच्याकडून घालण्यात आलेले नियम लोकांना दडपशाहीचा भाग वाटतात, राजकीय नेतेमंडळीही तरुणांच्या पाठीशी उभे राहून त्यांना बिनधास्तपणे डीजे वाजवण्याचे आवाहन करतात. काही तासांच्या मौजेसाठी लोकांना दीर्घ आजार देणारी, प्रसंगी त्यांचा जीव घेणारी असली प्राणघातक प्रतिष्ठा काय कामाची ? त्यामुळे डीजेवर कायमस्वरूपी बंदी येण्यासाठी राजकीय मंडळांची इच्छाशक्ती, पोलीस प्रशासनाचे सहकार्य आणि नागरिकांचा सहभाग नितांत गरजेचा आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## शर्यत

शर्यतीत धावताना
शेवटी असेन जरी
नियम घालू घेतला
स्पर्धापरिपूर्ण करी

करतो भली तयारी
कमी राहणारं तरी
आशा मात्र एकचि
जिंके मी कधी तरी

प्रत्येकस्पर्धकांमध्ये
धाकधूक ती अंतरी
स्पर्धातारीख जवळ
आगळी येते तरतरी

सतत विजयघातक
अहंकार येई नातरी
हरुन जातो सहजते
असूनही यशखातरी

जिंकणारं न् हरणारं
रे नक्कीचं कुणीतरी
यशाचा आनंद खास
डोईवरी शोभे छतरी

खिळाडू वृत्ती अंतरी
किर्ती जाय दिगंतरी
हरला तरी जिंकला
लक्षात राही निरंतरी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# शिवलिंगावर अर्पण केलेले दूध वाया जात नाही !

श्रावणमास सुरु झाला आणि त्यातील पहिला सोमवार सरून आता दुसरा सोमवार आला आहे. श्रावण मास म्हणजे भगवान शिवाच्या उपासनेचा मास. अनेक शिवभक्त श्रावण मासातील सोमवार व्रतस्थ राहून उपवास करतात.

त्यानिमित्ताने शिवमंदिरात जाऊन शिवलिंगाला दुग्धाभिषेक करतात. शिवलिंगामध्ये प्रचंड शक्ती सामावली असल्याने त्यावर ताम्र कलशाद्वारे सतत जलाभिषेक चालू ठेवला जातो. दूध हे जलाहून शीतल असल्याने शिवभक्त श्रद्धेने शिवलिंगावर दुधाने आभिषेक करतात. शिवलिंगावर अर्पण केलेले दूध असेच वाया न घालवता भाविकांना ते तीर्थ स्वरूपात वाटले जाते. शिवलिंगावर अर्पण केलेल्या दुधाचे तीर्थात रूपांतर झाल्यावर शिवलिंगाच्या चैतन्यामुळे त्याच्या चवीत होणारा



आमूलाग्र बदल प्रत्येक शिवभक्ताने अनुभवलेला असतो. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी मात्र श्रावण मास जवळ आला की, 'दूध पिंडीवर सांडून वाया घालवू नका त्याऐवजी ते गरिबांना वाटा' असा कंठशोष करताना आढळतात. मुळात शिवपिंडीवर वाहिलेले दूध कोणत्याही शिवमंदिरात वाया जाऊ न देता ते शिवभक्तांना तीर्थस्वरूपात वाटले जाते.

होळी जवळ आली कि कचऱ्याची होळी करा, होळी लहान करा पोळी दान करा, गणेशोत्सवात मूर्तीदान करा यांसारख्या मोहिमा ही मंडळी राबवत असतात. हिंदूंच्या सण उत्सवातील प्रथा परंपरांना आणि धर्मशास्त्रीय विधींना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून त्यावर आपली बुद्धी पाजळणारी ही मंडळी अन्य धर्मियांच्या सणांच्या वेळी मात्र मूग गिळून गप्प असतात. सुधारणावादी मंडळींना सुधारणा करायचीच आहे तर मनुष्याच्या वृत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी वर्षभर प्रयत्न करावेत. केवळ हिंदूंचे सण-उत्सव जवळ आले की धर्मशास्त्राशी तडजोड करण्याचे सल्ले देऊ नयेत.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### प्रायरेटी लिस्ट गरजू लाभार्थी घरकुलपासून वंचित राहणार नाही; तहेसिन देशमुख



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२३, परभणी :** १५ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण घरकुल प्रायरेटी यादी प्रसिद्ध झाली असून चारठाणा गणामध्ये १२९४ लाभार्थींची नावे आहेत त्यामध्ये मानकेश्वर १२०, पिंपरी खु ४१, मोळा ३५, कान्हा ४५, चारठाणा १०५३ जनांचा समावेश आहे. परंतु या यादीमध्ये सर्व करूनही बऱ्याच लाभार्थ्यांचे नाव आलेले नाही. चारठाणा, मानकेश्वर, मोळा, पिंपरी खु, कान्हा येथील जे लाभार्थी गरजू आहेत. परंतु त्यांची नावे अद्यापही या यादीत आले नाहीत अशा पात्र लाभार्थ्यांनी काळजी करण्याची गरज नाही. त्यांनी आपापल्या ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधून आधार कार्ड, बँक पासबुक व राशन कार्ड सह विनंती अर्जाचा नमुना सादर करावा असे आव्हान चारठाणा गणाचे पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाला हक्काचे पक्के घर आणि ग्रामीण भागाला बेघर मुक्त व झोपडपट्टी मुक्त करणे, हा संकल्प परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांनी हाती घेतला असून गरजू लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही. याची काळजी पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही घेत असून सर्व करूनही ज्या लाभार्थ्यांचे नाव आलेले नाही. त्या लाभार्थ्यांनी आपल्या ग्राम पंचायतशी संपर्क साधुन आपल्या अर्जा सह कागदपत्रे ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावे जेणेकरून राहिलेल्या पात्र गरजू लाभार्थी कुटुंबाचे प्रस्ताव पंचायत समिती जिंतूर मार्फत शासन दरबारी सादर केले जातील व पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या पुढाकाराने प्रत्येक वंचित व गरजू यापुर्वी लाभ न घेतलेल्या लाभार्थ्याला घरकुल योजनेचा लाभ मिळेल. असे पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख यांनी दैनिक देशोन्नतीशी बोलतांना सांगितले. त्यामुळे यादीत नाव नसलेल्या पात्र व गरजू लाभार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

### एसएनडीटी महिला विद्यापीठातील पहिल्या पदवीधर तुकडीचा सन्मान

#### गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव; सांस्कृतिक विभागाने दिला निरोप




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर येथे चार वर्षापूर्वी मुंबई च्या एसएनडीटी महिला विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू झाले. येथे शैक्षणिक सत्र २०२३-२६ कालावधीत पहिल्या तुकडीतील विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला. त्या पदवीधर झाल्या. त्यांना येथील सांस्कृतिक विभागाच्यावतीने शुक्रवारी भावपूर्ण निरोप देण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. एसएनडीटी महिला विद्यापीठातून पहिल्यांदा पदवीधर होत बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.उज्वला चक्रदेव यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या विद्यापीठात संचालक डॉ.राजेश इंगोले, उपकुलसचिव डॉ.बाळू राठोड, समन्वयक डॉ.वेदानंद अलमस्त, प्रा.अश्विनी वाणी, अपेक्षा पिंपळे, शितल बिल्लोरे यांची उपस्थिती होती. यावेळी एसएनडीटी महिला विद्यापीठाचे संचालक डॉ.राजेश इंगोले म्हणाले, की आपण विद्यापीठाच्या प्रारंभी शैक्षणिक सत्रात प्रवेश घेतला. आता तुम्ही पदवीधर झाले. यामुळे तुमची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. आपल्या साठी अभिमानास्पद कामगिरी आहे. तुम्ही आपल्या ज्ञानाचा, कौशल्याचा आणि येथील संस्काराचा उपयोग समाजहितासाठी करावा. आपणास मिळालेल्या संधीचे रुपांतर यशासाठी करावे, असे त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. दरम्यान गुणवंत विद्यार्थिनी म्हणून रिया जयकिशन तिलोखानी, गुंजा निषाद, श्रुती कांबळे, पुनम शर्मा आणि काशिश अलोने यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकुलसचिव डॉ.बाळू राठोड यांनी केले. संचालन अनुष्का ठाकूर व अंकीता यादव यांनी केले. आभार प्रदर्शन श्रुती टेंभुर्णे यांनी केले.

### चिंतलधाबा येथील विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे; कराटे प्रशिक्षक कुंदन पेंदोर यांचा स्तुत्य उपक्रम



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.२३, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चिंतलधाबा, पंचायत समिती पोंभुर्णा येथे विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कराटे प्रशिक्षणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.कराटे प्रशिक्षण देणारे मार्गदर्शक. कुंदन गुरुदास पेंदोर ब्लॅक बेल्ट यांनी स्वतः सायकलने अंतर कापत चिंतलधाबा येथे येऊन विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. बदलत्या परिस्थितीत मुलींनी आत्मविश्वासाने स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत, या उद्देशाने त्यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत चिंतलधाबा येथील प्रशासक शुभांगीताई कुत्तरमारे होत्या. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संतोष वेलादी, मुख्याध्यापक दीपक कोडापे, अरुणभाऊ कुत्तरमारे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

कोडापे सरांनी विद्यार्थिनींना आलेल्या अडचणीचा सामना करून स्वतःचं संरक्षण कशा पद्धतीने करायचं याबद्दल सविस्तर माहिती दिली आणि नंतर कुंदन पेंदोर यांनी प्रशिक्षणास सुरुवात केली.यावेळी विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कराटेच्या विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रशिक्षण घेतले. विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासाला चालना देणारा आणि त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयुक्त असा हा उपक्रम असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

स्वसंरक्षण ही काळाची गरज असून प्रत्येक विद्यार्थिनीने आत्मविश्वास, धैर्य आणि सजगता अंगीकारावी, असा संदेश या प्रशिक्षणातून देण्यात आला. कुंदन पेंदोर यांनी स्वतःच्या वेळेचा आणि श्रमाचा उपयोग विद्यार्थिनींच्या प्रशिक्षणासाठी केल्याबद्दल त्यांचे उपस्थितांनी कौतुक केले.

## महादुला - कोराडीत काँग्रेसचा भाजप विरोधात एल्गार

### 'अनुसूचित जाती के लोगो, बीजेपी छोडो' अभियानाचा भव्य शुभारंभ



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** महाराष्ट्रातील सध्याच्या बदलत्या राजकीय आणि सामाजिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्ह्यातील कोराडी-महादुला येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने 'अनुसूचित जाती के लोगो, बीजेपी छोडो' या प्रबोधन अभियानाचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

अभियानाच्या माध्यमातून काँग्रेसने केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर तीव्र निशाणा साधत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा घडवून आणली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस कमिटी अनुसूचित विभागाचे अध्यक्ष डॉ अनिरुद्ध बनकर होते तर उद्घाटक म्हणून माजी मंत्री सुनील केदार उपस्थित होते. काँग्रेस कमिटी प्रदेश महासचिव डॉ कोमल धांडे, स्वप्नील पाटोडे, राहुल घरडे, राजेश रंगारी, नरेश महाजन, दिनेश वाघमारे आदि उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव रत्नदिप रंगारी यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडलायावेळी वाढती महागाई, बेरोजगारी, नीट गैरव्यवहारावरून सरकारचा निषेध, देशात सातत्याने वाढणारी महागाई, तरुणांमधील बेरोजगारी, अनुसूचित जाती व घटकांवर होणारे अत्याचार तसेच नुकतेच समोर आलेले वैद्यकीय प्रवेश परीक्षेचे (छएएढ) पेपर फुटी प्रकरण यांसारख्या गंभीर प्रश्नांवर केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांचा धिक्कार करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. मार्गदर्शन करताना माजी मंत्री सुनील केदार यांनी देशातील ज्वलंत सामाजिक व आर्थिक सम स्यांवर प्रकाश टाकला. केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिक, तरुण, विद्यार्थी आणि वंचित घटक कसे भरडले जात आहेत, हे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभय बसोड, कुबेरपू सबारे, विलास बचाटे, शंकर धमी, गणेश नडे, आशिष जरवार, प्रदीप खोब्रागडे, शरद मेश्राम आणि निखिल बखरके या कार्यकर्त्यांनी म ोलाचे योगदान दिले.महादुला व कोराडी परिसरात या अभियानामुळे राजकीय वातावरण तापले असून काँग्रेसच्या या आक्रमक भूमिकेचा आगामी काळात जनतेवर काय प्रभाव पडतो. याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## पनवेल मनपा आयोजित देशातील पहिली एम्स मान्यता प्राप्त ४२ किलोमीटर हिल मॅरेथॉन खारघर येथे संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, पनवेल :** पनवेल म हानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'खारघर हिल म हापौर मॅरेथॉन'ला पनवेलकरांसह संपूर्ण महाराष्ट्रातून धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशातील पूर्ण ४२ कि.मी. अंतराची पहिली हिल मॅरेथॉन म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झालेल्या या स्पर्धे त सुमारे ९ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

पहाटे ४.३० वाजता महापौर नितीन पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, मुख्य प्रवर्तक परेश ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयपीएस अधिकारी कृष्णप्रकाश, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, प्रभाग समिती 'अ'चे सभापती रवींद्र भगत, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि सुप्रसिद्ध अभिनेता अंकुश चौधरी, राजकीय पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झेंडा दाखवून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली.४२ कि.मी. पूर्ण मॅरेथॉनसह २१ कि.मी. अर्ध मॅरेथॉन, १० कि.मी. धावणे, ५ कि.मी. धावणे आणि ३ कि.मी. आनंद दौड अशा विविध प्रकारांना मान्यवरांनी झेंडा दाखवून सुरुवात केली.



आजवरच्या इतिहासात आतापर्यंत अशी भव्य दिव्य मॅरेथॉन पनवेलमध्ये झाली नव्हती, या ऐतिहासिक मॅरेथॉन मुळे पुढील वर्षापासून या जागतिक मान्यता मिळून देश-विदेशातील धावपटू आकर्षित होतील. या मॅरेथॉनमुळे पनवेल महानगरपालिकेची राष्ट्रीय व जागतिक स्तरावर एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून, ही पनवेलकरांसाठी अभिमानाची गोष्ट ठरली आहे.

**दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र मॅरेथॉन**

महापौर नितीन पाटील व सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांच्या पुढाकाराने या मॅरेथॉनमध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामुळे दिव्यांगानाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. सुमारे १०० दिव्यांनी बांधवांनी या विशेष मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. दिव्यांग बांधवांनी या विशेष मॅरेथॉनचे आयोजन केल्याबद्दल पनवेल महापालिकेचे आभार मानले. लहान बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

**आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त**

अखचड प्रमाणपत्र मिळाल्यामुळे या मॅरेथॉनला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ९ हजार धावपटूंच्या सहभागामुळे ही स्पर्धा पनवेल महानगरपालिकेची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण करण्यास हातभार लावला आहे. पनवेलकरांसाठी ही निश्चितच अभिम ानाची बाब ठरली आहे.

नियमित धावण्याची सवय लागावी, नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे आणि युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही मॅरेथॉन क्रीडाप्रेमींसाठी पर्वणी ठरली. स्थानिक, ग्रामीण आणि निमशहरी भागातील धावपटूंना आपल्या परिसरातच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धे त सहभागी होण्याची संधी मिळाली. यामुळे नागरिकांमध्ये उत्साह निर्माण होण्याबरोबरच पनवेल परिसरातील पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्यास मदत झाली.

**सर्व स्तरांतून उत्स्फूर्त सहभाग**

नवी मुंबईचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, , माजी आयुक्त सुधाकर देशम ुख, ठाण्याचे सहायक पोलीस आयुक्त आदिनाथ बुधावर, उपजिल्हाधिकारी राहुल सूर्यवंशी, युवराज बनगर, ठाणे पोलीस उपायुक्त शैलेश काळे, उपायुक्त मनपा जयंत जावडेकर, एमएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी, विविध शासकीय आस्थापनांतील अधिकारी, खासगी कंपन्यांचे अधिकारी अशा विविध वरिष्ठ अधिकारी धावपटूंनी देखील या मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षकांनीही मॅरेथॉनम ध्ये सहभाग नोंदविला.

**९ हजार स्पर्धकांचा सहभाग**

या मॅरेथॉनमध्ये सुमारे ९ हजार स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये ३ आणि ५ कि.मी.च्या धावण्याच्या प्रकाराला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे २१ कि.मी. अर्ध मॅरेथॉनमध्ये ९ अंध धावपटूंनी सहभाग घेत आपल्या जिद्दीचे दर्शन घडविले.

**सुप्रसिद्ध अभिनेता अंकुश चौधरींची उपस्थिती**

खारघर हिल महापौर मॅरेथॉनला सुप्रसिद्ध अभिनेता अंकुश चौधरी यांनी विशेष उपस्थिती लावली. मॅरेथॉनच्या सुरुवातीला झेंडा दाखवून त्यांनी स्पर्धकांना प्रोत्साहन दिले.

**वैद्यकीय सुविधा**

या मॅरेथॉनसाठी महापालिकेने म ोठ्या प्रमाणात डॉक्टर्स, फिजिओथेरपिस्ट व ॲम्ब्युलन्स ची सोय केली होती.

मॅरेथॉनचे मार्ग३ कि.मी. : सेंट्रल पार्क – ग्रामविकास भवन – विश्वज्योत प्रीस्कूल – यू-टर्न – ग्रामविकास भवन – सेंट्रल पार्क.५ कि.मी. : सेंट्रल पार्क – ग्रामविकास भवन – मुर्बी मेट्रो स्थानक – यू-टर्न – ग्रामविकास भवन – सेंट्रल पार्क.१० कि.मी. : सेंट्रल पार्क – ग्रामविकास भवन – उत्सव चौक – बेलपाडा मेट्रो स्थानक – आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक – यू-टर्न – बेलपाडा मेट्रो स्थानक – उत्सव चौक – ग्रामविकास भवन – सेंट्रल पार्क.२१ कि.मी. : सेंट्रल पार्क – आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक – चाफेवाडी मेट्रो स्थानक – उत्सव चौक – ग्रामविकास भवन – उत्सव चौक – बेलपाडा मेट्रो स्थानक – फणसवाडी – यू-टर्न – आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक – बेलपाडा – सेंट्रल पार्क.४२ कि.मी. : सेंट्रल पार्क – ग्रामविकास भवन – मुर्बी जंक्शन – यू-टर्न – ग्रामविकास भवन – उत्सव चौक – बेलपाडा मेट्रो स्थानक – आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक – चाफेवाडी – फणसवाडी – यू-टर्न – आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक – बेलपाडा मेट्रो स्थानक – उत्सव चौक – गोल्फ कोर्स रोड – यू-टर्न – ग्राम विकास भवन – गुरुद्वारा – रांजणपाडा – खारघर फुटबॉल स्टेडियम – तळोजा जेल रोड – टाटा मेमोरियल सेंटर – यू-टर्न – तळोजा जेल रोड – खारघर फुटबॉल स्टेडियम – रांजणपाडा – मुर्बी जंक्शन – विबग्योर शाळा – यू-टर्न – मुर्बी जंक्शन – रांजणपाडा – गुरुद्वारा – सेंट्रल पार्क.

## बी.जे.एस. महाविद्यालयात महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत यशस्वी उमेदवारांचा सत्कार

**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.२२, वाघोली (पुणे) :** भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली येथे राष्ट्रीय छात्र सेना व स्पर्धा परीक्षा विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा सत्कार व अनुभवकथन कार्यक्रम आयोजित केला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून कु. प्राजक्ता प्रदीप पलांडे (राज्य कर निरीक्षक – STI) आणि कु. भाग्यश्री बाळासाहेब कांबळे (दुयम निबंधक श्रेणी-१ -SR व राज्य कर निरीक्षक – STI) उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा कक्ष प्रमुख प्रा.डॉ. ज्योतीराम मोरे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख सब ले. डॉ. शिवाजी सोनवणे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालय व्यवस्थापन समिती सदस्य तथा वाघोली शैक्षणिक प्रकल्पचे व्यवस्थापक मा. सुरेशजी साळुंके यांनी भूषविले.



यशस्वी उमेदवारांचे अनुभवः संघर्षातून यशाकडे या विषयावर बोलताना दोन्ही यशस्वी उमेदवारांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, MPSC सारख्या क्षेत्रात केवळ ग्लॅमर किंवा आकर्षण पाहून येऊ नये. स्वतःची कौशल्ये, कौटुंबिक आर्थिक परिस्थिती आणि नोकरीची सुरक्षितता विचारात घेऊन निर्णय घ्यावा. फक्त पुस्तके वाचणे किंवा अभ्यासाच्या तासांची स्पर्धा करणे म्हणजे तयारी नव्हे; स्वतःच्या क्षमता, कल आणि कौटुंबिक पार्श्वभूमीनुसार अभ्यासपद्धती ठरवावी. स्पर्धा परीक्षेच्या अनिश्चिततेमुळे होणारा ताण कमी करण्यासाठी नेहमी "Plan B' तयार ठेवावे. अभ्यास करताना नकारात्मक गोष्टींपासून स्वतःला अलग (isolated) ठेवावे. योग्य मार्गदर्शन, डिजिटल कौशल्ये व अख सॉफ्टवेअर, मानसिक-शारीरिक आरोग्य, समस्या-निराकरण क्षमता आणि उत्तम संवाद कौशल्ये ही आज काळाची गरज आहेत. वारंवार येणारे अपयश क्षमता संपल्याचे चिन्ह नसून अभ्यासपद्धती बदलण्याचा सिग्नल आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात सुरेशजी साळुंके यांनी सांगितले की, प्रशासन म्हणजे लोकसेवक असतो त्याने समाजासाठी काम करावे. यशस्वी उमेदवारांच्या मेहनतीला, जिद्दीला आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना मिळालेले हे यश कुटुंब तसेच महाविद्यालयासाठी अभिम ानाची बाब आहे. दोन्ही मान्यवरांना पुढील शासकीय सेवेसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला विज्ञान विभाग प्रमुख डॉ.डी. एन. पाटील, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संजय गायकवाड, डॉ.रुपाली गुलालकरी, कला शाखा प्रमुख डॉ.भूषण फडतरे, सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य तथा शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड, डॉ.सचिन कांबळे, प्रा.चक्रधर शेळके, प्रा.प्रतीक्षा सानप, कार्यालय अधीक्षक मा.शाम पाटील, बाजीराव औटे, आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालय एकूण १०० विद्यार्थी व एनसीसी कॅडेट्स कार्यक्रमाला उपस्थित होते.

अक्षराज



# विंचूरच्या सर्वांगीण विकासासाठी 'विंचूर विकास मंच'ची स्थापना

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर(नाशिक) :** गावाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांच्या सहभागातून विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी विंचूरमध्ये'विंचूर विकास मंच'या पक्षविरहित सामाजिक व्यासपीठाची स्थापना करण्यात आली आहे.

जनसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीदवाक्य स्वीकारून हा मंच गावात विधायक कामांना दिशा देणार आहे. हे व्यासपीठ कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसून, गावातील शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, अखंडित पाणीपुरवठा, रोजगार, महिला सक्षमीकरण, युवकांचे प्रश्न, शेतकरी हित, पर्यावरण संवर्धन आणि शासकीय योजना गावपातळीवर पोहोचवणे यांसाठी कार्य करेल. गावातील सर्व समाजघटकांना समान न्याय आणि विकासात पारदर्शकता आणणे हे मंचाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**मंचाची प्रमुख उद्दिष्टे व कार्यपद्धती :-**

पक्षीय राजकारण बाजूला ठेवून केवळ गावाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य.वॉर्डनिहाय व गल्लीबोळातील मूलभूत अडचणींची नोंद घेऊन त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा. पारदर्शक कारभार, लोकसहभाग आणि संघभावनेतून सार्वजनिक प्रश्नांवर तोडगा. तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि निस्वार्थी वृत्तीच्या सर्व घटकांना विकास प्रक्रियेत थेट सामावून घेणे.

**नागरिकांना सहभागाचे आवाहन**

गावातील विविध समस्या व विकासात्मक सूचना नागरिकांनी मंचाकडे मांडाव्यात, जेणेकरून संबंधित शासकीय व प्रशासकीय यंत्रणेकडे पाठपुरावा करून त्या मार्गी लावता येतील. गावच्या विकासासाठी पक्षभेद विसरून या लोकचळवळीत ज्ञानाचा, वेळेचा आणि अनुभवाचा हातभार लावावा, असे आवाहनविंचूर विकास मंचतर्फे करण्यात आले आहे.

# माथेरानमध्ये साथीच्या आजाराचा उद्रेक; रुग्णालयावर वाढला ताण

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२३, माथेरान :** पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, अस्वच्छता आणि बाहेरील खाद्यपदार्थांमुळे नागरिक त्रस्त; प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. माथेरानमध्ये सध्या साथीच्या आजारांनी नागरिक त्रस्त झाले असून, विशेषतः जुलाब, उलट्या, खोकला पोटदुखी, मळमळ यांसारख्या आजारांच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे.

पावसाळ्यात विविध ठिकाणांहून वाहून येणारे पाणी, सांडपाणी व इतर दूषित पाण्याचे प्रवाह मुख्य जलप्रवाहात मिसळण्याची शक्यता असल्याने पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात अस्वच्छता, उघड्यावर विकले जाणारे खाद्यपदार्थ आणि दूषित पाण्यामुळे विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. मच्छरांमुळे मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, फायलरिया यांसारखे आजार होऊ शकतात, तर दूषित अन्न-पाण्यामुळे टायफॉईड, अतिसार, पोटदुखी, मळमळ व उलट्या यांसारखे आजार उद्भवू शकतात. झुरळे व इतर कीटकांमुळेही अन्न दूषित होण्याचा धोका असतो. सध्या सर्दी-खोकल्याचे रुग्णही मोठ्या प्रमाणात आढळत असून, हे आजार संसर्गजन्य असल्याने एका व्यक्तीकडून कुटुंबातील इतर सदस्यांमध्ये संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे आजारी व्यक्तींनी इतरांपासून शक्यतो अंतर ठेवावे आणि गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

**दररोज ३० ते ४० रुग्ण उपचारासाठी**

बी.जे. हॉस्पिटलचे डॉक्टर प्रशांत यादव यांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. सध्या दररोज सुमारे ३० ते ४० रुग्ण साथीच्या आजारांच्या उपचारासाठी रुग्णालयात येत असून, त्यापैकी काही रुग्णांना सलाईन व इतर उपचारांसाठी दाखल करून घ्यावे लागत आहे. रुग्णालयात सध्या १२ बेड उपलब्ध असतानाही त्यापेक्षा अधिक रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे चित्र आहे. रविवारच्या सुट्टीच्या दिवशीही रुग्णालय रुग्णांनी भरून गेले होते.

डॉक्टर यादव यांनी नागरिकांनी पाणी उकळून थंड करून प्यावे, घरात शक्य असल्यास योग्य फिल्टरचा वापर करावा आणि बाहेरील उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाणे टाळावे, असे आवाहन केले आहे. पाणी उकळून पिण्यामुळे अनेक जलजन्य आजारांचा धोका कमी करता येऊ शकतो. बी जे हॉस्पिटल मध्ये कर्मचारीवर्गाचीही कमतरता असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पडत आहे. काही कर्मचारी अनुदानातून नियुक्त करण्यात आले होते; मात्र वेतन वाढ न मिळाल्याने काहींनी नोकरी सोडल्याची माहिती समोर आली आहे. साथीच्या आजारांची परिस्थिती असताना वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता ही प्रशासनासाठी गंभीर बाब असून, याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यातमाथेरानमधील सद्यस्थिती लक्षात घेता प्रशासनाने तातडीने अतिरिक्त वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत. शहरात आवश्यक त्या ठिकाणी औषध फवारणी करावी, पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी करावी तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती करावी. नागरिकांना स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि आरोग्यविषयक खबरदारी घेण्याचे आवाहन स्पीकरद्वारे करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनी ही स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे.

उकळलेले पाणी पिणे, बाहेरील उघड्यावरचे पदार्थ टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि आजाराची लक्षणे जाणवल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घेणे, हीच सध्याची काळाची गरज आहे.

# वेकोलीचा भयंकर हलगर्जीपणा; २५ लाखांच्या देखभालीनंतरही स्फोटकांच्या व्हॅनला लागली आग

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड (थउङ) च्या सुरक्षेचा आणि वाहनांच्या देखभालीचा बोगसपणा समोर आला आहे. १७ ऑगस्ट २०२६ रोजी धोकादायक स्फोटक साहित्य घेऊन जाणाऱ्या वेकोलीच्या एका एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायराला धूर निघून आग लागली होती. सदर प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या दुरुस्ती आणि देखभालीवर काही महिन्यांपूर्वी नोव्हेंबर २०२५ मध्ये २ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आले होते, असे असतांना सुद्धा एक्सप्लोसिव्ह व्हॅनचा अपघात घडल्याने नागरिक व कर्मचाऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. १७ ऑगस्ट रोजी ही एक्सप्लोसिव्ह




व्हॅन जवळपास ६ टन स्फोटके घेऊन जात असताना अचानक धूर व आग दिसून आली सुदैवाने स्थानिक चिकन विक्रेत्यांच्या तत्परतेमुळे आगीवर वेळेत नियंत्रण मिळवण्यात आले व मोठी घटना टळली. जर ही आग आत असलेल्या स्फोटकांपर्यंत पोहोचली असती तर संपूर्ण खापरखेडा परिसरात दुर्दैवी घटना झाली असती.

एक्सप्लोसिव्ह व्हॅनवर नोव्हेंबर २०२५ मध्ये जवळपास २ लाख ५० हजार रुपयांचा निधी खर्च झाला असे असताना अवघ्या ९ महिन्यांत एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायर जवळ आग कशी काय लागते? हे समजण्या पलीकडे आहे. देखभालीदरम्यान ब्रेक सिस्टीम, व्हील हब, वायरिंग व टायर्सची योग्य तपासणी झाली नव्हती का?

स्फोटक वाहतुकीसाठी लागणारे फिटनेस प्रमाणपत्र आणि सुरक्षा मानके डावलली गेली का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

या गंभीर प्रकारानंतर नोव्हेंबर २०२५ मधील २ लाख ५० हजार रुपयांच्या मेंटेनन्सचे वर्क ऑर्डर, सुटे भाग बदलल्याचे बिल, तपासणी अहवाल आणि फिटनेस सर्टिफिकिट सार्वजनिक करण्याची मागणी जोर धरत आहे. सदर खर्च खरोखरच वाहनाच्या दुरुस्तीवर झाला की केवळ कागदोपत्री बिले काढली गेली याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

एक्सप्लोसिव्ह व्हॅन स्फोटक वाहनातील छोटीशी तांत्रिक चूक सुद्धा शेकडो लोकांचा जीव घेऊ शकते त्यामुळे या घटनेला केवळ एक सामान्य वाहन दुर्घटना न मानता वेकोलिच्या हलगर्जीपणाचा गंभीर इशारा मानला पाहिजे. यासंदर्भात निष्पक्ष तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हे प्रकरण दाबले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेच्या मराठवाडा संघटक पदी जैनोदीन पटेल रावणगांवकर निवड




**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२३, मुखेड (नांदेड) :** राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषद या सामाजिक संघटनेच्या मराठवाडा संघटक पदी सामाजिक कार्यकर्ते जैनोदीन पटेल रावणगावकर यांची निवड करण्यात आली. जैनोदीन पटेल रावणगावकर यांनी मुखेड तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातच काय महाराष्ट्रातील पिडीत समाजासाठी, धरणग्रस्तासाठी, पत्रकारिताच्या माध्यमातून व सामाजिक संघटनांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात अविरत ३० वर्षापासून कार्य केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या मान्यतेने मराठवाडा अध्यक्ष अब्दुल माजीद बशीर यांच्या हास्ते नांदेड येथील विशामगृहात प्रमुख कार्यक्रत्यांच्या बैठकीत नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. जैनोदीन पटेल रावणगावकर यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, राष्ट्रीय आल्पसंख्याक परिषदे मार्फत दिलेल्या मराठवाडा संघटक पदाच्या माध्यमातून मराठवाड्यातील ग्रामिण क्षेत्रासह शहरातील आल्पसंख्याक घटकासाठी सामाजिक, शैक्षणिक व विविध समस्याचा दिन दुबळ्याचा अवाज म्हणून समाज कार्यात आहोरात्र कार्य करत दिलेल्या मराठवाडा संघटक पदाचा समाजासाठी आवाज उठवण्यात कार्य करणार आहे आसे मनोगत व्यक्त केले यावेळी आल्पसंख्याक यावेळी संपादक आल्ताफ सानीसर, फ्रो.जुबेर खाँन, डॉ.हाकिमखान, शेखर पापुलवार, म.अझरोदीन, शेख दाऊद, जिल्हा अध्यक्ष महेताबभाई सह इतर परिषदेचे पदूअधिकारी व कार्यक्रते उपस्थित होते रावणगावकर यांच्या निवडी बद्दल संपादक महेबुबभाई पुणे, पंडीतभाऊ दाभाडे, सखाराम जाधवसर कोल्हापूर, अकबरभाई बिड, मुनिरखाँन पठाण लातूर, करामतखाँ पठाण परभणी, शेख युनुस भाई छ.संभाजीनगर, युसूफ भाई हिंगोली, शाफिक भाई जालना, शिवशंकर पाटील कलंबरकर, आशद बल्की, अ.रज्जाक पठाण,ऑ. आसलम शेख, गौसभाई सलगरकर, जलील पठाण, मोतीपाशा पाळेकर, सरपंच मन्नूभाई, येवतीकर, इम्रान अत्तार, जयभिम सोनकांबळे, सादीकभाई बा-हाळीकर सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संदिप माणिकराव तांबारे यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार २०२६' जाहीर; सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव




**अक्षराज : अर्जुन कवडे**

**दि.२३, येरमाळा (धाराशिव) :** स्वराज्य फिल्म प्रॉडक्शन संघटना महाराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'दादासाहेब फाळके पुरस्कार २०२६' यंदा प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते संदिप माणिकराव तांबारे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट समर्पण आणि अनुकरणीय सेवांबद्दल त्यांना या गौरव प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात येत आहे.

तांबारे यांनी सामाजिक न्याय, मानवतावादी मूल्ये आणि समाजाच्या उत्थानासाठी घेतलेली अविरत मेहनत अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणारी ठरली आहे. अनेक वर्षांच्या निःस्वार्थ सेवेतून त्यांनी समाजात सहानुभूती, सचोटी आणि प्रेरणादायी नेतृत्वाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या याच बहुमूल्य कामगिरीची दखल घेत त्यांना मानवतेच्या सेवेचे खरे प्रतीक म्हणून या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात येत असल्याचे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) गिरीश शिवदास राजूरकर यांनी सांगितले.

स्वराज्य फिल्म प्रॉडक्शन ही संस्था भारत सरकारच्या नीती आयोगांतर्गत नोंदणीकृत असून, ती विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करत असते. तांबारे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## थोडक्यात बातम्या

# मिरा-भाईंदर शहरातून भूमिपुत्रांना हद्दपार करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव - परिवहन मंत्री सरनाईक यांचा गंभीर आरोप



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, मिरा-भाईंदर :** महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मिरा-भाईंदर हे मराठी आगरी कोळी भूमिपुत्रांचे वसवलेले शहर आहे. पण गेल्या काही वर्षांपासून सत्ताधारी पद्धतशीरपणे इथल्या मराठी माणसाला, भूमिपुत्रांना शहराबाहेर काढण्याचे काम करत आहेत. भाईंदर पश्चिम मुर्धा गावात भूमिपुत्राचे घर पालिकेने मोठ्या संख्येने पोलीस बंदोबस्त आणून बुल्लडोझर ने घर पाडले.

**त्यांनी आरोप केले की -**

१. मूळ गावठणातील भूमिपुत्रांच्या जमिनी बिल्डरांच्या घशात घातल्या जात आहेत.

२. पालिकेत नोकऱ्या, ठेके यामध्ये स्थानिक भूमिपुत्रांना डावलले जात आहे.

३. शहराचे नियोजन बाहेरच्या लोकांच्या फायद्यासाठी केले जात आहे.

आम्ही हे कदापि खपवून घेणार नाही. भूमिपुत्रांसाठी आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले तरी चालेल, असा इशारा प्रताप सरनाईक यांनी दिला.

यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा तापण्याची शक्यता आहे. सदर बाब विधानसभेत ही मांडले जाईल.

# भिसेगाव येथे रा.जि.परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्वामी समर्थ सेवा केंद्राकडून शैक्षणिक साहित्य वाटप




**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२३, कर्जत (रायगड) :** विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र व अन्न छत्रालय, पळसदरी यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा, भिसेगाव येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. अध्यक्ष विक्रांत दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील पहिली ते सातवीपर्यंतच्या एकूण ६४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. विशेषतः शाळेतील बहुतांश विद्यार्थी आदिवासी समाजातील असून, त्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाला मोठे प्रोत्साहन मिळणार असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी स्वामी सेवेकरी अभिजीत दरेकर, दत्तात्रय दरेकर, जीवन थोरवे, पत्रकार जयेश जाधव, पुंडलिक भोईर तसेच पत्रकार शिवाजी जाधव उपस्थित होते. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक संतोष दातीर, शिक्षिका रंजना अनिल थोरवे आणि शिक्षक बाबासाहेब साहेबराव ढाकणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना स्वामी सेवेकरी दत्तात्रय दरेकर उर्फ दादू दरेकर यांनी सांगितले की, भिसेगाव शाळेच्या मागणीनुसार गरजू विद्यार्थ्यांना वह्या व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. कर्जत, खालापूर तसेच पेण तालुक्यातील विविध शाळांमध्येही संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. ज्या शाळांना ज्या साहित्याची आवश्यकता आहे, ते उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असून, भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक ती मदत करण्याचा प्रयत्न सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी मिळालेल्या साहित्याचा पुरेपूर उपयोग करून शिक्षणात प्रगती करावी आणि आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन ही त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. शाळेचे मुख्याध्यापक संतोष दातीर यांनी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र व अन्नछत्रालय पळसदरीचे आभार मानले.

# शिक्षक भारती चंद्रपूर जिल्हा सहविचार सभा संपन्न



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२३, चिमूर (चंद्रपूर) :** शिक्षक भारती चंद्रपूर जिल्हा सहविचार सभा चंद्रपूर येथील गौरव सेलिब्रेशन हॉल येथे शिक्षक भारती राज्य उपाध्यक्ष राजेंद्र झाडे यांचे अध्यक्षतेत संपन्न झाली. सहविचार सभेला प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारती अध्यक्ष नवनाथ गेंड, शिक्षक भारती विदर्भ समन्वयक अतुल देशमुख, राज्य संयुक्त कार्यवाह संजय खेडीकर, म.रा. प्राथमिक शिक्षक भारती नागपूर विभाग अध्यक्ष सुरेश डांगे, गडचिरोली जिल्हा अध्यक्ष पुंडलिक देशमुख, शिक्षक भारती विशेष शाळा चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष महेश भगत, माध्यमिक जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम टोंगे, प्राथमिक जिल्हा अध्यक्ष नंदकिशोर शेरकी उपस्थित होते. सहविचार सभेत नवनाथ गेंड, राजेंद्र झाडे, अतुल देशमुख, संजय खेडीकर, महेश भगत यांनी शिक्षक भारती पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. टीईटी, वस्तीशाळा शिक्षकांची जुनी सेवा, जूनी पेन्शन योजना, अशैक्षणिक आणि ऑनलाईन कामे यासह विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. आगामी नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक नियोजनसंदर्भात चर्चा करण्यात आली. सहविचार सभेत नागपूर विभागीय उपाध्यक्ष पदी विरेनकुमार खोब्रागडे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. दिनांक ०५ सप्टेंबरला काळ्या फिती लावून काम आणि २ ऑक्टोबरला गांधी जयंती दिवशी मुंबई येथे होणाऱ्या आझाद मैदान ते मणी भवन लाँगमार्च पायी मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन याप्रसंगी करण्यात आले. सहविचार सभेचे प्रास्ताविक सुरेश डांगे यांनी केले. संचालन विरेनकुमार खोब्रागडे यांनी केले. सहविचार सभेला शिक्षक भारती पदाधिकारी तथा सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.